# एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ
# विद्यार्थिनीं साहित्य संमेलन

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या वतीने तीन दिवसीय विद्यार्थिनींच्या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. मराठी, इंग्रजी, गुजराती, संस्कृत, आणि हिंदी अशा पाचही भाषांना समाविष्ट करून घेणारे असे हे वैशिष्टयपूर्ण साहित्यसंमेलन आहे. भाषांमधील काही मान्यवर लेखक व समीक्षक या संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थिनींच्या दृष्टीने हा अत्यंत आनंददायी व समृद्ध असा अनुभव असेल. या संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या संमेलनात, लेखन करणा-या विद्यार्थिनींना सादरीकरणाची संधी मिळणार आहे. विद्यार्थिनींचे काव्यवाचन, लघुकथावाचन, नाटय-सादरीकरण, कविता-पोस्टर -प्रदर्शन असे उपक्रम या संमेलनात असणार आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी यामध्ये मोठया प्रमाणावर सहभागी व्हावे, अशी अपेक्षा आहे.

**स्थळ:-पाटकर हॉल, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई**
**काळ:- दिनांक २६ ते २८ फेब्रुवारी २०१४**
**वेळ :-रोज सकाळी:- १० ते सायंकाळी ५**

ज्या विद्यार्थिनींना या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी आपले लेखन दिनांक ३१ जानेवारी २०१४ पर्यत अधिष्ठाता, विद्यार्थी कल्याण विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई-४०००२० यांच्याकडे पाठवावे. हे लेखन पुढील स्वरूपात अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुकथा (वाचनासाठी) वेळमर्यादा | - | ५ मिनिटे (सुमारे १००० शब्द मर्यादा ) |
| कविता (वाचनासाठी) वेळमर्यादा | - | ३ मिनिटे |
| कविता (पोस्टरकरिता) | - | |
| पथनाटय सादरीकरण वेळमर्यादा | - | ५ ते ७ मिनिटे |

विद्यार्थिनींकडून आलेल्या लेखनाची निवड विद्यापीठाची निवडसमिती करील. याबाबत निवडसमितीचा निर्णय अंतिम राहील.

सही/-
(डॉ. नितिन प्रभुतेंडोलकर)
सहा. अधिष्ठाता

सही/-
(डॉ. लिंडा डेनिस)
प्रभारी अधिष्ठाता
विद्यार्थी कल्याण विभाग
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ